पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. महिला व बालकल्याण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

दिनांक - **११/०३/२०१५** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **११/०३/२०१५** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा. जाधव साधना रामदास - सभापती**
**२.** मा. सौ.पानसरे अमिना महंमद
**३.** मा. जयश्री वसंत गावडे
**४.** मा. काळभोर वैशाली जालिंदर
**५.** मा. आल्हाट मंदा उत्तम
**६.** मा. सौ.स्वाती प्रमोद साने
**७.** मा. बो-हाडे शुभांगी संजय
**८.** मा. भालेकर अरुणा दिलीप
**९.** मा. पवार संगीता शाम

या शिवाय मा.खांडकेकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी, मा.बहाद्दरपुरे - सहा.समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ११/०२/२०१५ व २५/०२/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १३ )** चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : २० विषय क्रमांक : १
दिनांक : ११/०३/२०१५ विभाग : नागरवस्ती विकास योजना
सुचक : मा.वैशाली काळभोर अनुमोदक : मा.स्वाती साने
संदर्भ :- मा.सहा. आयुक्त यांचे प्रत्र क्र.नावियो/३/कावि/३१/२०१५, दि.०३/०३/२०१५

मा.सहा. आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

नागरवस्ती विकास योजना विभागाकडील महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात. महिला व बालकल्याण योजना क्र.१६ अंतर्गत मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४५७ दि.२०/०१/२०१४ अन्वये मंजूर धोरणानुसार घटक योजना क्र.१६ इ. १२ वी

नंतरचे उच्च शिक्षण (एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.डी.एस., बी.यु.एम.एस.) एम.बी.ए. युवतींना अर्थसहाय्य देणे या योजने करिता जाहिर प्रकटनानुसार अर्ज मागविणेत आले होते. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात २३२ अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची अटी शर्तीनुसार तपासणी केली असता ४३ अर्ज पात्र झालेले असून १८९ अर्ज अपात्र झाले आहेत. सदर पात्र लाभार्थीला प्रत्येकी र.रु.१५,०००/- या प्रमाणे एकूण ४३ लाभार्थीसाठी र.रु.६,४५,०००/- (अक्षरी र.रु. सहा लाख पंचेचाळीस हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षात "१२ वी नंतरचे वैद्यकीय (एम.बी.बी.एस., बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., बी.डी.एस., बी.यु.एम.एस.,) एम.बी.ए. अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवी " या उपलेखाशिर्षावर रक्कम रु.३०,००,०००/- इतकी तरतूद शिल्लक आहे त्यामधून खर्च करणेत येईल. पात्र लाभार्थींना अर्थसहाय्य अदा करण्याकरिता येणा-या र.रु.६,४५,०००/- (अक्षरी र.रु.सहा लाख पंचेचाळीस हजार फक्त) चे खर्चास तसेच यानंतर दि.३१ ऑगष्ट २०१५ पर्यंत अपात्रतेची पुर्तता करुन पात्र ठरणा-या लाभार्थींना अर्थसहाय्य देणेकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( जाधव साधना रामदास )
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२३३/२०१५
दिनांक : १३/०३/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.